भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठीचा ₹ ४०००.०० लक्ष (रुपये चाळीस कोटी फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पिय वितरणप्रणालीवर वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. फुंफला-२०१९/प्र.क्र.८४/९-अे,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ०६ जून, २०१९

संदर्भ:-

१. कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राफयो-२०१८/प्र.क्र. ४७/९अे, दि. ०६.०७.२०१८
२. कृषी व पदुम विभाग. क्र. राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे, दिनांक २०.१२.२०१८ चे पत्र.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १.४.२०१९
४. कृषी व पदुम विभागाचे क्र. लेखानु-२०१९/प्र.क्र.२३/१९/२-अे, दि. ०८.०४.२०१९ चे पत्र
५. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३ जून, २०१९.

प्रस्तावना :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरू केली आहे. सदर योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यास संदर्भाधीन क्र.५ येथील दिनांक ०३.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेची चालू वर्षी अंमलबजावणी करण्याकरिता सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये ४०००.०० लक्ष (₹ चाळीस कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदर निधी आयुक्त कृषी यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे..

शासन निर्णय:-

१. सन २०१९-२० मध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या अंमलबजावणीकरिता सर्वसाधारण प्रवर्गासाठी ₹ ४०००.०० लक्ष (₹ चाळीस कोटी फक्त) एवढा निधी आयुक्त कृषी यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशीर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्र. डी-३
२४०१- पिक संवर्धन
११९, बागायती व भाजीपाला पिके,
(०१) फळे (३३)
भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना
(२४०१ A८८९) ३३ अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात आलेल्या ₹ ४०००.०० लक्ष (₹ चाळीस कोटी फक्त) एवढ्या रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरण करण्याकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर योजनेंतर्गत अनुदान लाभार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे अदा करण्यात यावे.

५. या शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच निधी विनियोगाच्या अनुषंगाने आयुक्त (कृषी) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी निश्चितपणे खर्च होईल याची खात्री करावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील अटी व शर्तीचे अनुपालन करण्याच्या अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०६१६५७०६९६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.06.06 17:02:22 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. मंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. विरोधी पक्ष नेता,महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
९. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व विभागीय कृषी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.

१२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१३. सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
१५. वित्त विभाग,(व्यय-१) मंत्रालय, मुंबई-३२
१६. संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१७. सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -३२
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२१. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२२. निवड नस्ती/९-अे.